# पुणे विद्यापीठ
## विद्यार्थी कल्याण मंडळ

**: परिपत्रक क्र. १९७/२०१३ :**

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१३–२०१४ पासून कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजने अंतर्गत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थिंनी व्यक्तिमत्व विकास योजना, निर्भय कन्या अभियान व आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजनेसंदर्भातील जे महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले त्याबाबतची माहिती खाली नमूद करण्यात येत आहे.

१) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत काम देताना यापूर्वी अवलंबविण्यात येणारे सूत्र 'मागेल त्याला काम' याऐवजी 'उपलब्धतेनुसार काम' देण्यात यावे. विद्यार्थ्यांना या योजनेत सहभागी करुन घेताना ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न हे रु. २ लाखांपर्यंत असेल अशाच विद्यार्थ्यांस या योजनेत सहभागी करुन घ्यावे. सदर विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्नाचा दाखला हा मा. तहसिलदार यांचे स्वाक्षरीचा असावा. या योजनेत सहभागी विद्यार्थ्यांपैकी कमीत कमी ३० टक्के सहभाग हा मुलींचा असावा.

२) आदिवासी भागातील महाविद्यालयांव्यतिरिक्त इतर महाविद्यालयांना अनुदान देताना महाविद्यालयाच्या एकूण विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात खालीलप्रमाणे अनुदान देण्यात येईल.

| अ.क्र. | महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या | अनुदानाची कमाल मर्यादा |
|---|---|---|
| १. | ०००१ ते ०५०० | रु. ०,४०,०००/– |
| २. | ०५०१ ते १००० | रु. ०,७०,०००/– |
| ३. | १००१ ते २००० | रु. १,३५,०००/– |
| ४. | २००१ ते ३००० | रु. २,००,०००/– |
| ५. | ३००१ ते ४००० | रु. २,६५,०००/– |
| ६. | ४००१ ते ५००० | रु. ३,३०,०००/– |
| ७. | ५००१ च्या पुढे | रु. ३,९५,०००/– |

३) 'उपलब्धतेनुसार काम' योजनेसाठी विद्यापीठातील तसेच सर्व संलग्न महाविद्यालयातील/संस्थेतील अनुसुचित जाती (SC), अनुसुचित जमाती (ST), भटक्या व विमुक्त जाती (VJNT), विशेष मागासवर्ग (SBC), अल्पसंख्याक (Minorioty) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मानधन देताना ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न हे रु. २ लाखांपर्यंत असेल अशाच विद्यार्थ्यांस विद्यापीठामार्फत १०० टक्के अनुदान देय असेल. सदर विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्नाचा दाखला हा मा. तहसिलदार यांचे स्वाक्षरीचा असावा. या शिवाय निराधार प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी पूर्वीप्रमाणेच विद्यापीठामार्फत १०० टक्के अनुदान देय असेल.

खुला प्रवर्ग (Open) व इतर मागासवर्ग (OBC) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे मानधन हे ७५:२५ (विद्यापीठाकडून ७५% व महाविद्यालय/संस्थेकडून २५% ) या टक्केवारीनुसार देय असेल.

...२...

४) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका या योजनेत सहभागी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या रूपये २०/–प्रतितास या मानधनात वाढ करण्यात आली असून १ जुलै, २०१३ पासून हा दर रूपये २५/– प्रतितास एवढा करण्यात येत आहे. हा मानधनाचा दर पुढील ४ वर्षासाठी म्हणजेच आर्थिक वर्ष २०१६–१७ पर्यंत कायम राहिल. मानधनाची रक्कम पूर्वीप्रमाणेच धनादेशाद्वारे विद्यार्थ्यांच्या बॅंक खात्यात जमा करण्यात यावी.

५) 'विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास योजना' राबविण्यासंबंधी आर्थिक तरतूद रु. ५,०००/– वरुन रु. १०,०००/– करण्यात येत आहे.

६) 'निर्भय कन्या अभियान' राबविण्यासंबंधी आर्थिक तरतूद रु. ५,०००/– वरुन रु. १५,०००/– करण्यात येत आहे.

७) आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजना राबविण्यासंबंधी आर्थिक तरतूद रु. १५,०००/–वरुन रु. २५,०००/– करण्यात येत आहे.

८) विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) म्हणून नामनिर्देशन केलेल्या व्याख्याता / प्राध्यापक यांच्या वार्षिक रुपये ३,६००/– या मानधनात वाढ करण्यात आली असून शैक्षणिक वर्ष २०१३–१४ पासून व्यक्तिगत खर्चाची परिपूर्ती म्हणून (Pocket Allowance) विद्यापीठाकडून दरवर्षी रु. ५,०००/– अदा करण्यात येईल. मात्र व्यक्तिगत खर्चाची परिपूर्ती (Pocket Allowance) अदा करताना खालील बाबी ग्राहय धरण्यात येणार आहेत.

अ) महाविद्यालय/संस्थेत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, विशेष मार्गदर्शन योजना व विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास या तीन योजना राबविणे अनिवार्य राहिल.

ब) पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाद्वारे आयोजित केल्या जाणाऱ्या विविध उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग असावा.

क) सर्व योजनांचे हिशेब विहित नमुन्यात निर्धारित वेळेत केंद्रिय लेखा परिक्षणाचे वेळी सादर करणे अनिवार्य राहिल.

ड) वरील 'अ','ब', व 'क' या बाबींची पूर्तता न केल्यास परंतु इतर कोणत्याही तीन योजना/उपक्रम राबविल्यास त्या विद्यार्थी कल्याण अधिकाऱ्यांस वार्षिक व्यक्तिगत खर्चाची परिपूर्ती (Pocket Allowance) रु. ३,६००/– देण्यात येईल.

९) जिल्हा समन्वयकांचे मानधन रु. ३,६००/– वरुन व्यक्तिगत खर्चाची परिपूर्ती (Pocket Allowance) रु. ५,०००/– इतके करण्यात येईल.

...३...

१०) ज्या महाविद्यालयात/संस्थेत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने १५० किंवा त्या पेक्षा जास्त आहे. आणि एकूण विद्यार्थी संख्या ५००० किंवा त्यापेक्षा जास्त असेल अशा महाविद्यालयात/संस्थेत विद्यार्थी कल्याण अधिकाऱ्यांस मदतनीस म्हणून शैक्षणिक वर्ष २०१३–१४ यावर्षापासून एक सहाय्यक विद्यार्थी कल्याण अधिकारी नियुक्त करण्यात यावा. सदर सहाय्यक विद्यार्थी कल्याण अधिकारी यांचे नियुक्तीस मा. संचालक विद्यार्थी कल्याण मंडळ यांचेकडून रितसर मान्यता घेण्यात यावी. विभागीय जिल्हा समन्वयक व सहाय्यक विद्यार्थी कल्याण अधिकारी यांना वार्षिक व्यक्तिगत खर्चाची परिपूर्ती (Pocket Allowance) रु. २,५००/– देय असेल.

**वरील परिपत्रकाचा आशय संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.**

**विद्यार्थी कल्याण मंडळ**
गणेशखिंड, पुणे – ७
दिनांक : ३१ जुलै, २०१३
जावक क्र. :२०१२–१३/२२७

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये.
२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था.